**तक्रार यूएलपी क्र १७९/२०१८.**
**नि क्र सीडब्ल्यू १ श्री धनंजय माणिकराव पंगुडवाले**

शपथेवर कथन करतो की;

**माझे नाव श्री धनंजय माणिकराव पंगुडवाले**

वय. ६४ वर्षे राहणार. सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि क्र सीडब्ल्यू १ खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**पुढील सरतपास सामनेवालातर्फे श्री एस एस कालेकर विधिज्ञ यांचेतर्फे**

आता मला यादी नि क्र सी १० सोबत दाखल केलेली कागदपत्रे पान नं १ ते ३९ दाखविण्यात आले. सर्व कागदपत्रे जिल्हा न्यायालयातून प्रमाणित प्रती दाखल केले आहे ते संयुक्तिक सी.........वरती आहे.

**सरतपासणी पूर्ण**

**उलटतपासणी तक्रारदारातर्फे श्री बी टी जाधव विधिज्ञ यांचेतर्फे**

मला या न्यायालयाकडून साक्षी करिता हजर राहण्यासाठी समन्स आलेले नाही. मी सामनेवाले यांचेकडे लिपिक म्हणून कार्यरत होतो व मी सन २०१९

मध्ये सेवानिवृत्त झालो. मी दि १०.०७.२०१३ रोजी रिलीव्हर म्हणून (सुटटी सोडविणारा कर्मचारी ) म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी श्री काटगावकर यांचेकडून चार्ज घेतला. सदर दिवशी ४/१२ पाळीत चार्ज घेतला. दि १०.०७.२०१३ रोजी दुस–या पाळीत ४/१२ पाळीत मा.आयुक्त यांनी भेट दिली. सदर दिवशी मी व लिपिक असे दोघेच कामावरती होतो. हे म्हणणे खरे आहे की सदर दिवशी तपासणीनंतर आयुक्तांनी मस्टरवर सहया केल्या नाहीत. सकाळी ८ ते ४ पाळीतील श्री काटगांवकर यांचेकडून मी चार्ज घेतला. सदर चार्ज घेताना मी पैसे व पावती पुस्तक ताब्यात घेतले. श्री काटगांवकर यांनी ₹ १६;३८०/– कमी दिले. हे म्हणणे खरे आहे की सदर तपासणी दिवशी श्री काटगांवकर यांनी ₹१६;३८०/– कमी दिल्याबाबत मी तपासणी आयुक्तांना सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की आयुक्तांनी पावतीपुस्तक व रक्कम स्वत तपासली. हे म्हणणे खरे आहे की आयुक्तांनी पैसे कमी आले म्हणून शेरा मारलेला नाही. तिस–या पाळीत रात्री १२ ते सकाळी ८ या पाळीत कोणीही आले नसल्यामुळे मीच तिसरी पाळी केली. दुस–या दिवशी पहिल्या पाळीत सकाळी ८ ते ४ पाळीत श्री जोशी लिपिक यांचेकडे चार्ज दिला. त्यानंतर चार्ज देताना श्री जोशी लिपिक यांना श्री काटगांवकर यांनी ₹ १६३८० कमी दिल्याची पावती त्यांना सांगितले. हे म्हणणे खरे आहे की दि १०.०७.२०१३ नंतर त्या नाक्यावर कामास गेलो नाही.

जकात नाक्यावर जमा होणारी रक्कम सकाळी १० ते ११ यावेळेत

महानगर पालिकेची वसूलीची गाडी आल्यानंतर रक्कम जमा केली जाते. हे मला माहित नाही की सदर दिवशी रक्कम बरोबर भरली अगर कशी साक्षीदार स्वतहून सांगतो की त्या दिवशी श्री जोशी लिपिक यांनी पैसे भरले. हे म्हणणे खरे आहे की दि १०.०७.२०१३ रोजी श्री काटगांवकर; मी स्वत व श्री सरवदे व दुस–या सकाळचे श्री जोशी लिपिक कामावर होते.

मी तक्रारदार श्री बनसोडे यांना ओळखतो. हे मला माहित नाही की दि १०.०७.२०१३ रोजी तक्रारदार कामावर होते अगर कसे. हे मला माहित नाही की तक्रारदार दि १०.०७.२०१३ सुटटीवर होते. मी पुन्हा सांगतो की सदर दिवसाचा भरणा श्री जोशी लिपिक यांनी केला होता. दुस–या दिवशी मी कामावर गेलो नाही मला कुणीही सांगितले नाही की श्री जोशी लिपिक यांनी ₹ १६३८०/– रक्कम भरले.

आता मला प्रतिज्ञापत्र नि क्र सीडब्ल्यू १ पान नं २ वरुन दुसरा परिच्छेद दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की परिच्छेद क्र २ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की दि १०.०७.२०१३ रोजी मी सलग दोन पाळीमध्ये काम केले परंतू त्या दिवशी तक्रारदार त्याठिकाणी आलेले नव्हते. मी श्री खंदारे साहेब यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की तपासणी दिवशी श्री खंदारे साहेब यांनी एक्सकॉर्ट फी खिर्द बुक नं ९ रजिस्टर नं ५२/२०६२ घेवून गेले. हे म्हणणे खरे आहे की सदर दिवशी तक्रारदार एक्सकॉर्ट नाक्यावर आलेले

नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी केवळ व्यवस्थापनास मदत व्हावी म्हणून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पूर्ण** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपासकाही नाही.**

सही /-
(मु.रा.कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दिनांक.०७.०८.२०२५
माकम